# ॥बाबा ॥
# विडा

विडा घ्या हो बाबा देवा
दिनानाथा माय बापा ।
विनविती ममदे भोळे
मस्तक ठेवोनिया पायी॥ धृ ॥

शांती नागवेली सुंदर
पान पिकले खासी ।
अहंकार जाळोनिया
चुना लावूनिया त्यासी ॥ 1 ॥

मी पण सुपारी फोडूनी
कर्पूरी घोळीयेली ।
वैराग्य जायफळ
पत्री सुवासिक चांगली ॥ 2 ॥

प्रीती हा कातरंग
दया लवंगा वेलदोडे ।
मिळूनी शुध्द सत्त्व
भक्ती सिद्ध झाली चांग ॥ 3 ॥

अनंत कोटी अनंत रूपी
अनंत युगाचा तू स्वामी
त्रिदोष जाती निघूनी

जड-मुढा तू उद्धारी ॥ 4 ॥

★★★★★